# ग्रामीण भागात शिकूनही करिअर घडते

## प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन : कुंभश्री मासिक सन्मानपत्र, शिष्यवृत्ती प्रदान सोहळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

मी स्वतः ग्रामीण भागातील शाळेत, विद्यालयात शिकलो. १२ वीला तुमच्याएवढे मार्क्स मिळाले नसतानाही स्वतःहून निवडलेल्या संख्याशास्त्र विषयात पदवी, पदव्युत्तर शिक्षण विशेष प्रावीण्यासह पूर्ण केले. त्यानंतर त्या विषयात संशोधनही केले. जिद्द व आत्मविश्वास या बळावरच मी माझ्या करिअरमध्ये उच्च पदावर पोहोचलो. त्यामुळे ग्रामीण भागात शिकूनही उत्तम करिअर घडवता येते, त्याबद्दल न्यूनगंड बाळगू नका, असे प्रतिपादन प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

पन्हाळा-गगनबावडा तालुका कुंभार समाज संघ व कुंभश्री मासिक कोल्हापूर ऑफिस यांच्या विद्यमाने पन्हाळा-बावडा तालुका व कोल्हापूर शहरातील १० वी व १२ वीमध्ये उत्तुंग यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना कुंभश्री सन्मानपत्र व कुंभश्री शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी डॉ. एम. व्ही. कुंभार, कुंभश्री मासिकाचे जिल्हा प्रतिनिधी अरविंद राणे आदी उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, शहरी वा ग्रामीण यावर यश अवलंबून नसते, तर ते तुम्ही किती परिश्रम घेता यावर ते अवलंबून असते. जो सातत्यपूर्ण प्रवास करतो तो एक दिवस यश नावाच्या मुक्कामी पोहोचतोच. त्यामुळे आजपासून नव्हे, तर आतापासूनच वाट चालायला सुरुवात करा. या वर्षी कोल्हापूर शहर व जिल्ह्यात ३० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली आहे. तसेच



**कोल्हापूर : दहावी, बारावीमध्ये उत्तुंग यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करताना शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. डावीकडून अरविंद राणे, रामचंद्र कुंभार आदी.**

कुंभश्री मासिक आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या व मेडिकल तसेच इंजिनिअरिंगकडे जाऊ इच्छिणाऱ्या समाजातील ६ विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी ४० हजारप्रमाणे ४ वर्षे बिनव्याजी कर्जाऊ शिष्यवृत्ती दिली जाते याचाही लाभ घ्या. कोणत्याही बाबतीत पुढील आपले करिअर घडविताना काही अडचण आल्यास संपर्क साधा.

अरविंद राणे यांनी कुंभश्री मासिकाच्या इतर चांगल्या उपक्रमांबद्दल माहिती दिली तसेच १२ वीनंतर इंजिनिअरिंग, मेडिकलशिवाय करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी इतर अनेक क्षेत्रे उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. बँकिंग, आर्टस् क्षेत्रातही अनेक संधी उपलब्ध आहेत. सायन्सच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन करताना बेसिक सायन्समध्ये पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेऊन, शिक्षण व संशोधन क्षेत्रातही नाव कमविता येते. स्पर्धा परीक्षा देऊन, प्रशासकीय अधिकारी होण्यासाठी तीन शाखांमध्ये (बी.एससी., बी. कॉम., बी.ए.) पदवी घेतल्यानंतर संधी उपलब्ध आहेत. त्या संपादन केल्या पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले. आभार विक्रम कुंभार यांनी मानले.

## शिवाजी विद्यापीठ (दूरशिक्षण केंद्र)

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रामध्ये विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, कामगार, बंदीजन आणि इतरांसाठी दूरशिक्षण अंतर्गत बी. ए. ( मराठी, इंग्रजी, हिंदी, संस्कृत, उर्दू, अर्धमागधी, इतिहास आदी ) एम. ए. (मराठी, इंग्रजी, हिंदी, संस्कृत, उर्दू,जैनालॉजी आदी ) , बी. कॉम., एम.कॉम. (ॲडव्हान्स अकौंटिंग, ॲडव्हान्स कॉस्टिंग, ॲडव्हान्स बँकिंग ॲंड फायनान्शियल सिस्टीम, आदी ), एम. एस्सी (गणित) पी.जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन, एम. कॉम. (व्हॅल्युएशन ऑफ रियल इस्टेट) अशा विविध अभ्यासक्रमांचा समावेश आहे. ११ प्रोग्रॅमअंतर्गत विविध कोर्सेस, दुर्गम भागांसह ७९ अभ्यास केंद्राची सोय, अभ्यासकेंद्रामध्ये संपर्कसत्राचे आयोजन, विषयतज्ज्ञांकडून मार्गदर्शन आणि नेट-सेट स्पर्धा परीक्षांबाबत उद्बोधनही या केंद्रामार्फत केले जाते.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांतील नियतकालिक स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर आदी. (छाया : नाज ट्रेनर)

# नियतकालिक स्पर्धेत 'विवेकानंद' प्रथम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांतील नियतकालिक स्पर्धेत (बिगर व्यावसायिक गट) विवेकानंद महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला.

विद्यापीठाच्या वतीने संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील सर्जनशीलतेची जोपासना व्हावी, यासाठी महाविद्यालयांतून दरवर्षी नियतकालिके प्रसिद्ध केली जातात.

या अंकातून विद्यापीठाने ही स्पर्धा सुरू केली. २०१७-१८ या स्पर्धेत ७७ बिगर व्यावसायिक व २३ व्यावसायिक महाविद्यालयांनी स्पर्धेत भाग घेतला. वैयक्तिक पातळीवर १३८ व १७० विद्यार्थ्यांना पारितोषिके प्राप्त झाली आहेत. या महाविद्यालयांना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते फिरता चषक व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, डॉ. सर्जेराव जाधव, सुशांत पाटील आदी उपस्थित होते. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी आभार मानले.

## बिगर व्यावसायिक गट

विवेकानंद महाविद्यालय (प्रथम), बळवंत कॉलेज विटा, सांगली (द्वितीय), यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, पन्हाळा (तृतीय). व्यावसायिक गट- अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आष्टा, सांगली (प्रथम), दानचंद घोडावत चॅरिटेबल ट्रस्टचे संजय घोडावत ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन, अतिग्रे (द्वितीय), डी. के. टी. ई. सोसायटीचे वस्त्रोद्योग व अभियांत्रिकी महाविद्यालय, इचलकरंजी (तृतीय).